Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.69
ISSN No. 2456-1665

# महात्मा ज्योतिबा फुले यांचे शैक्षणिक विचार

**शरद भिमराव गाडेकर**
संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
छत्रपती संभाजीनगर

**प्रस्तावना:**

महात्मा ज्योतिबा फुले यांचे शिक्षण व अभ्यासक्रमातून प्रकट होणारे विचार:- स्वातंत्र्य,समता आणि बंधुता या त्रयीवर नेतांत भरवसा ठेवणारे आणि सामाजिक विषमतेच्या विरोधात आवाज उठवणारे महात्मा फुले हे महापुरुष होते. त्यांना महाराष्ट्राचे मार्टिन ल्युथर म्हणून ओळखले जाते. ते मानवतावादी विचाराचे होते. त्यांनी मेकॉलेच्या खलीत्यास कडाडून विरोध 'शिक्षण हे वरच्या वर्गापासून खालच्या वर्गापर्यंत पाझरत आले पाहिजे' या विचारास फुलेंचा विरोध होता कारण इंग्रजाचा भर प्रथम वरचा वर्ग शिकला पाहिजे व नंतर खालचा वर्ग शिकावा यावर होता. 'प्रथम खालच्या वर्गातील लोकांना शिक्षण देऊन नंतर वरच्या वर्गातील लोकांना शिक्षण द्यावे 'आधी कळस मग पाया असे न होता, आधी पाया मग कळस. अशा पद्धतीने शिक्षण प्रणाली हसण्यावर महात्मा फुले यांचा आग्रह होता. प्रथम उपेक्षितांना शिक्षण नंतर अपेक्षितांना शिक्षण हे सूत्र अमलात आणावे; यावर भर देण्यात आला.

**शिक्षण विषयक ज्ञान व विचार :-**

शिक्षण हा तिसरा डोळा मानले जाते आणि त्यामुळेच महात्मा फुले यांनी शिक्षणावर अधिक प्रकाश टाकला आहे आणि शिक्षण कोणत्याही एका व्यक्तीची मक्तेदारी न बघता सर्वांना शिक्षण मिळावे शिक्षणाचा प्रसार होऊन ज्ञान व विचारांची वृद्धी व्हावी यासाठी महात्मा फुलेंनी योगदान दिले. महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची सुविधा उपलब्ध करून दिल्या. तसेच बालगृहाची स्थापना देखील केली. अशा प्रकारे महात्मा फुले यांनी समाज परिवर्तनाचे कार्य करताना स्वतःच्या घरादाराचाही विचार न करता काम केले आणि म्हणून आज आपला समाज मानाने सर्व प्रकारचे शिक्षण घेत आहे.अशा शिक्षण तज्ज्ञाला,शिक्षण महर्षीच्या कार्याला कोटी-कोटी वंदन.

ज्योतिरावांच्या शिक्षणाचे उद्दिष्ट हे समता निर्माण करावयाचे होते. शत्रूंना शिक्षण दिले तर मानवी हक्काची जाणीव होईल व ते आपले हक्क मिळविण्यासाठी प्रयत्न करतील असे त्यांचे मत होते. त्यांना समाजात बंडखोरी निर्माण करायची नव्हती तर मानवता निर्माण करायची होती. हे फक्त शिक्षणानेच होईल असे त्यांचे मत होते. कुटुंब ही मुलांची पहिली शाळा असते म्हणून त्यांनी या महान कार्याची सुरुवात स्त्री शिक्षणापासून केली. इंग्रजांना वाटायचे की समाजातील वरिष्ठ वर्गाला ज्ञान दिले पाहिजे ते ज्ञान कनिष्ठ वर्गापर्यंत झिरपत जाईल परंतु त्यांचा हा विचार खोटा ठरला. ज्योतिरावांनी शेतकरी, स्त्री, शूद्र यांना त्यांच्या व्यवहारात पडेल असे शिक्षण देण्यावर भर दिला. समाजातील तळागाळातील सर्व मुलांना

प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे असा प्रस्ताव मांडला. तसेच या मुलांना शिकविण्यास त्यांच्याच मधील शिक्षक निर्माण करावे असे त्यांना वाटत असे कुणीही शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून बोर्डिंग निर्माण कराव्या असा विचार त्यांनी मांडला.

सामाजिक कार्यात ज्योतिबांची भिस्त प्रामुख्याने लोकशिक्षणावर होती. राज्यकर्त्यांनी जर मनात ठरविले तर ते अस्पृश्यांना शिक्षणाचे कवाडे उघडी करून त्यांच्या विकासाचे काम अगदी सहजपणे करू शकतात असा त्यांचा विश्वास होता. अस्पृश्यांच्या मुलाचे मन शाळेमध्ये शिक्षणासाठी रमेल हे काम करण्याची जबाबदारी राज्यकर्त्यांची आहे असे त्यांना वाटत असे परंतु राज्यकर्तेच याबाबत उदासीन असल्याची खंत त्यांच्या मनात होती." शिक्षणात अशा सुधारणा पाहिजे की ज्याने वरिष्ठ वर्गातील नीती व बुद्धिमत्ता यांची पातळी उचं होईल" ईस्ट इंडिया संचालकांनी केलेले हे विधान तेव्हाच खरे होऊ शकते जेव्हा वरिष्ठ वर्गामध्ये न्याय,स्वातंत्र्य,समता, शिक्षण या विषयी अनुकूल मत निर्माण होईल. अशा प्रकारे महात्मा फुले यांनी बहुजन समाजाला शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन त्यांना सन्मानाने जगण्याची दिशा दिली. सर्व मानव ही एकाच ईश्वराची लेकरे असून सर्वांना आपला सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विकास करून घेण्याचा सारखा सारखा अधिकार आहे. ही सत्याची जाणीव समाजाला करून दिली महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवन कार्यावरून आपल्याला त्यांच्या शैक्षणिक विचारांची ओळख होते.

भारतीय प्रस्थापित उच्चवर्णीय लोकांनी खालच्या वर्गातील लोकांना शिक्षणापासून वंचित ठेवले याकरिता धर्म,जातीव्यवस्था,वर्ण व्यवस्था पुढे आणून शुद्रातीशुद्रांना फसविले त्यांना अंधारात ठेवले, त्यांच्यातील अज्ञानीपणाचा फायदा घेतला त्या संदर्भात महात्मा फुले यांनी मनुस्मृतींना आव्हान देऊन अशी घोषणा केली की,

**"आता तरी तुम्ही मागे घेऊ नका।**
**धिक्कारूनी टाका मनुमता।**
**विद्या शिकताच पावाल ते सुखा।**
**घ्यावा माझा लेख ज्योती म्हणे॥**

सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण: भारतात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत या विचारांचा पुरस्कार करणारे प्रथम भारतीय नागरिक महात्मा फुले होते. ही मागणी त्यांनी 19 ऑक्टोबर 1882 मध्ये हंटर शिक्षण आयोगासमोर साक्ष देतांना मांडली. प्राथमिक शिक्षण, उज्वल भविष्याचा व सामाजिक विकासाचा पाया आहे हे त्यांनी अनेक उदाहरणासह स्पष्ट करून त्याचे महत्त्व अधोरेखित केले.

**शिक्षण प्रणालीत अमुलाग्र बदल:**

महात्मा फुले यांच्या मते आजची शिक्षण पद्धती ही बहुजन समाजाला शिक्षणापासून वंचित करणारी आहे तेव्हा शिक्षण प्रणाली बदलली पाहिजे यावर अधिक भर त्यांनी दिला. केवळ कारकून वर्ग

तयार करणाऱ्या वर्गाची निर्मिती शिक्षणातून होऊ नये तर मानवी जीवन जगण्यास सक्षम बनविणारे उद्योगी जीवन उपयोगी शिक्षण देण्यात यावे.

राष्ट्र निर्मितीसाठी शूद्रांना शिक्षणः राष्ट्र उभारणीमध्ये बहुजन समाज शिक्षणापासून अलिप्त आहे. याची जाणीव त्यांना होती त्यांच्या उद्धारासाठी शिक्षण हा एकमेव मार्ग आहे शूद्रातिशुद्रांना शिक्षण देऊन सुशिक्षित केल्याशिवाय राष्ट्राची प्रगती होणार नाही.त्यासाठी शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली झाली पाहिजे यावर त्यांचा विशेष भर होता.

**महात्मा फुले यांचे कार्य :-**

रूढी परंपरेच्या बंधनात जखडलेली स्त्री, अस्मानी व सुलतानी संकटात सापडलेली शेतकरी, शूद्रातील शूद्र हेच ज्योतीरावांच्या कार्याचे प्रमुख क्षेत्र होते. यांचा उद्धार जर करावयाचा असेल तर यांना आधी शिक्षण दिले पाहिजे. शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही यावर ज्योतिरावांचा विश्वास होता.यासाठी स्त्रियांच्या शिक्षणावर ज्योतिरावाने भर दिला आहे.या संदर्भात निर्मळ गुरुजी म्हणतात." समानतेचे आणि साऱ्या सुधारणांचे मूळ म्हणजे शिक्षण! नारी जातीची कुचंबना आणि शूद्रांची विटंबना शिक्षणामुळेच दूर होईल या खात्रीने ज्योतिबांनी शिक्षण प्रसाराच्या सेवा कार्याला सुरुवात केली".

समाज जीवनात बदल घडविण्याचे सामर्थ्य शिक्षणातच आहे. हे सत्य ओळखून शिक्षणाची चळवळ उभी करणारे पहिले भारतीय महापुरुष महात्मा ज्योतिराव फुले हेच होत. केवळ शाळा काढणे हे त्यांचे उद्दिष्ट नव्हते शिक्षणांची त्यांचीही चळवळ मुला-मुलींसाठी तर शाळेबाहेर समाजासाठी अव्याहत चाललेला मानव मुक्तीचा संघर्ष होता. शिक्षणाने माणूस सामाजिक जाणिवेचा जबाबदार व्यक्ती बनावा, अन्यायाविरुद्ध बंड करणारा नीतिमान नागरिक बनावा अशी त्यांची शिक्षणाच्या चळवळीच्या उभारणी मागील मूळ भावना होती. असे असले तरी शिक्षण आणि उदरनिर्वाह यांचा संबंध पूर्णतः तोडून पुस्तकी ज्ञानांची पोपटपंची करणाऱ्या पांढरपेशयांचा वर्ग तयार करण्याची त्यांची इच्छा नव्हती. म्हणूनच शिक्षणाद्वारे श्रम प्रतिष्ठा जोपासण्यात यावी. प्रत्यक्ष श्रम करण्याची सवय लागावी म्हणून शैक्षणिक अभ्यासक्रमात त्यांचा समावेश करणारे आधुनिक भारतातील ते पहिले द्रष्टेय होत. म्हणूनच शिक्षणाच्या क्षेत्रात त्यांना शिक्षण तज्ञ म्हणून मानले पाहिजे.

**सारांश**

महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणाचे महत्त्व ओळखून महत्त्व ओळखून स्त्री शिक्षण विषयक चळवळ अधिक गतिमान करण्यासाठी अपार कष्ट घेतले महात्मा फुले म्हणतात की पुरुषांच्या शाळेपेक्षा स्त्रियांच्या शाळेची अधिक गरज आहे कारण तिच्या स्त्रिया आपल्या मुलांना बालपणात जे संस्कार लावतात त्यातच त्यांच्या शिक्षणाची बीजे असतात शूद्राति शूद्र

स्त्रियांना खरा मानव धर्म कळावा त्याच बरोबर न्याय,अन्याय, समजावा कर्म-अकर्म समजावे, आपले कर्तव्य आणि हक्क याची जाणीव व्हावी या दूरदृष्टीने स्त्रियांना पहिल्यांदा शिक्षण दिले पाहिजे सर्व

समाजाने शिक्षित होऊन अंधश्रद्धेला,कर्मकांडाला तितांजली देऊन मानव विकास साधावा म्हणून महात्मा फुले म्हणतात.,

**"स्त्री- पुरुष सर्व कष्टकरी व्हावे**

**कुटुंब पोसावे आनंदाने ॥१॥**

**नित्य मुला-मुलींना शाळेत घालावे**

**अन्नदान द्यावे विद्यार्थ्यांस ॥**

शिक्षण हे जीवन विकासासाठी असते, मानवाच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्वाचा विकास शिक्षणामुळे होतो सुप्त गुण फुलतात, बहरतात हा शिक्षण विषयक आधुनिक दृष्टिकोन क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचा होता.

**संदर्भ:**

1.सेंदाणे आत्माराम,ज्योतिबांचा विचार वनवा,प्र 56, सुगावा प्रकाशन,पुणे,1मे 2012.

2. मराठी साहित्य संशोधन विशेषांक,जुलै/सप्टें.2015.

3. धनंजय किर(1968) महात्मा ज्योतिराव फुले-आमच्या समाज क्रांतीचे जनक.

4.हरी नरके,य.दी.फडके-महात्मा फुले गौरव ग्रंथ ख 1.

5. कांडगे,राम महा-महात्मा ज्योतीराव फुले व्यक्ति कार्य, जयश्री प्रकाशन चाकण,ता.खेड,जि.पुणे प्रथम आवृत्ती मार्च 2005